# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३**

## आदिवासी विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण**<br>**बाब क्रमांक: २३२, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१) | ५९८५ | १० | बुलढाणा जिल्हयातील मलकापुर व नादूरा तालुक्यांमध्ये अनुसूचित जमाती चे लोक बहुसंख्येत असणे, प्रत्येक गावांमध्ये त्यांच्या वस्त्या असणे, त्याचे करिता अनुसूचित जमातीच्या वस्त्यांच्या विकासाकरिता ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेतून निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (२) | ५९४८ | १० | अमरावती जिल्ह्यात मेळघाट हा १०० % आदिवासी बहुल भाग असणे , तसेच अमरावती जिल्ह्यात मेळघाट वगळता मोठ्या प्रमाणात आदिवासी समाजाची संख्या असणे, मेळघाट वगळता जिल्ह्यातील १००% आदिवासीच्या प्रमाणात ५०% टक्के आदिवासीची संख्या दर्यापूर मतदारसंघात असून येथील आदिवासी वस्त्या पाड्यावर मोठ्या प्रमाणात मूलभूत सुविधांचा अभाव असणे, दर्यापूर अंजनगाव सुर्जी आणि अचलपूर तालुक्यातील वस्त्या पाड्यांचा विकास करण्यासाठी तसेच येथे मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची नितांत आवश्यकता असणे, दर्यापूर मतदारसंघातील आदिवासी वस्त्या पाड्यांच्या विकासासाठी २० कोटी निधीची आवश्यकता असणे, ठक्कर बाप्पा आदिवासी योजनेअंतर्गत आदिवासी वस्त्या पाड्यांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: टी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: २४०, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. शिरीष चौधरी** |
| (३) | ६०३३ | १० | जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुका आदिवासी भागातील रस्त्यांची झालेली दुरावस्था पाहता आदिवासी भागातील वाहतूक व आदिवासी लोकांना होत असलेला त्रास याकडे शासनाचा होत असलेले अक्षम दुर्लक्ष त्या संदर्भात प्रजिमा - |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | 1 ते गारखेडा मोहमांडली अंधरमळी बोरखेडा न्हावी रोड इजिमा 14 किमी 13/0ते २२/०० चे जलनिस्सारणाच्या कामासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. रावेर तसेच बोरखेडा मोहमांडली अंधारमळी निमड्या गारखेडा ते प्रजिमा- १ रस्ता इजिमा १४ किमी ३/१०० ते १२/०० चे जलनिस्सारणाच्या कामासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. रावेर, जानोरी ते चिंचाटी रस्ता ग्रामा किमी ०/०० ते ४/०० चे मजबुतीकरण करणे यासर्व कामांकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (४) | ५९३८ | १०० | रस्ते व पुलांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी रु. १०००००००० इतका अतिरिक्त निधी मंजूर केला आहे. परंतु, १२८ डहाणू (अ.ज.) विधानसभा मतदार संघात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नसणे, डहाणू विधानसभा मतदार संघात डहाणू व तलासरी हे दोन तालुके येणे, तसेच, उक्त परिसर हा आदिवासी बहुलभाग असणे, तरी डहाणू विधानसभा मतदार संघासाठी ३०५४ अंतर्गत ०४ या लेखाशीर्ष खाली निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: टी-६** <br> **मुख्य लेखाशीर्ष: ४२२५,अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण यावरील भांडवली खर्च** <br> **बाब क्रमांक: २४२, रूपये:- २,०००/-** <br> **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (५) | ५९९४ | १० | भंडारा जिल्हयात लाखनी व लाखांदूर तालुक्यातील आदिवासी मुला/मुलींचे शासकीय वस्तीगृह नसणे, त्यामुळ शिक्षण घेणा-या आदिवासी विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २१ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) आदिवासी विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई